# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: १८७, रूपये:- ३४,०२,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ७४१ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका हा द्राक्ष व डाळींब पिकाचे जास्त प्रमाणात उत्पादन घेणारा तालुका म्हणून ओळखला जातो. याठिकाणचे द्राक्ष व डाळींब हे परदेशातही मोठ्या प्रमाणात निर्यात केले जाणे, परंतु याच ठिकाणी वाईन उद्योगाला प्रोत्साहन दिल्यास स्थानिकांना रोजगार तसेच शेतकऱ्यांच्या फळ पिकास चांगला भाव मिळू शकेल. सबब सांगोला तालुक्यामध्ये वाईनरी हब प्रकल्प उभारण्याकरीता वाईन उद्योगास प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य उभारण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: १८९, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२) | ७२७ | १० | पुणे शहराचा व्याप झपाट्याने वाढत असून शहरात दररोज मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक करणारे ट्रक दाखल होतात, हे ट्रक दिवसा शहरात प्रवेश करत असल्यामुळे मुख्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडी प्रचंड प्रमाणात वाढणे, परिणामी अपघातांचे प्रमाणही वाढणे, सदर समस्या सुटण्यासाठी व पुणे शहरात वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी, शहराच्या बाहेरील, पुणे - अहिल्यानगर महामार्ग, पुणे - सोलापूर महामार्ग, पुणे - बेंगळूर महामार्ग (NH 48), पुणे - मुंबई महामार्ग (NH 48), पुणे - नाशिक महामार्ग (NH 60) या प्रमुख राष्ट्रीय व राज्य महामार्गालगत आणि सध्या प्रस्तावित असलेल्या MSRDC चा बाह्य रिंग रोडला किमान २० एकर जागेत व PMRDA च्या अंतर्गत रिंग रोडला किमान १० एकर जागेत ट्रक टर्मिनल्स उभारणे आवश्यक, सदर टर्मिनल्स शहराच्या बाहेरील मध्यवर्ती, सुलभ आणि वाहतूक दृष्ट्या योग्य ठिकाणी विकसित केल्यास, शहरातील मालवाहतूक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नियंत्रित करता येईल. अपघात आणि प्रदूषणही कमी होईल. तसेच या प्रस्तावित ट्रक टर्मिनलमध्ये ट्रक पार्किंग, माल चढवणे-उतरणे केंद्र, इंधन पंप, ट्रक रिपेअर सुविधा, ड्रायव्हर व कामगारांसाठी निवास/विश्रांती गृह, सुरक्षा व्यवस्थेसाठी CCTV आणि आरटीओ चौकी अशा सुविधा असणे आवश्यक, पुणे शहराच्या बाहेरील व लगतच्या तालुक्यांमध्ये ट्रक टर्मिनल उभारणीबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५३, आलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग**<br>**बाब क्रमांक: १९१, रूपये:- १०,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३) | ७२६ | १० | जिल्ह्यात हवेली व लगतच्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या उत्खनन सुरू असणे, अनधिकृत प्लॉटिंग व्यवसाय, बांधकाम व्यवसाय व इतर कारणासाठी शासनाची कोणतीही परवानगी न घेता उत्खनन सुरू असणे, यामध्ये ओढे नाले यांचा नैसर्गिक प्रवाह बदलून तो अवैधरित्या इतरत्र वळवणे किंबहुना तो पूर्ण बुजून टाकणे, त्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढून जीवित हानी होणे, शासनाचा कोणत्याही प्रकारचा परवाना न घेता परस्पर आर्थिक हित संबंध जोपासून होत असलेल्या उत्खननात शासनाचा मोठ्या प्रमाणात करोडो रुपयाचा महसूल बुडणे, अवैधरित्या उत्खनन करून जमिनीचे सपाटीकरण करण्यात येणे, त्यातून प्लॉट तयार करून ते अनाधिकृतपणे गोरगरीब नागरिकांना विकणे त्यातून बखळ पैसा कमाई करणे. अशा बेकायदेशीररित्या उत्खनन करणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: के-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६८०१, वीज प्रकल्पांसाठी कर्जे**<br>**उप लेखाशीर्ष:**<br>**बाब क्रमांक: १९२, रूपये:- ४७,६८,९९,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (४) | ७७३ | १०० | माणगाव ता. कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग येथील माणगाव कोटीचीराई ते माणगाव तळीवाडी दरम्यान मुख्य वीज वाहिनी उपलब्ध नसल्याने माणगाव तळीवाडी भागाचा वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत असणे, त्यामुळे लोकांची गैरसोय होणे, लोकांची मुख्य वाहिनी टाकण्याची वारंवार होत असलेली मागणी, याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | ७७५ | १०० | फाळकेवाडी (चंडवाडी), ता.वाळवा, जि.सांगली येथील काही शेतकऱ्यांनी शेतीसाठी वारणा नदीतून ६.५ कि.मी.अंतरावरुन पाणी उचलणेकरीता २.५ कोटी रक्कम खर्च केला असणे. त्यासाठी ४० एचपीच्या दोन मोटारी बसविणे गरजेचे असणे. सद्यस्थितीत पारंपारिक पध्दतीने शेतीपंप विज कनेक्शन देणे बंद असने, "मागेल त्याला सौर पंप योजनेअंतर्गत" शेतीसाठी पाणी उपसा करणेकामी १० एचपी पर्यंत सौर पंप बसविण्याची योजना सध्या सुरु असणे, परंतू सौर ऊर्जावरील पंप बसवून शेतीसाठी पाणी उपसा करणे शक्य नसणे, तसेच सौर ऊर्जा प्रकल्प वारणा नदीकाठी जागेअभावी बसवणे शक्य नसणे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीपंप वीज कनेक्शन साठीच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मान्यता मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ७७७ | १०० | शासनाकडून उपसा सिंचन योजनांमध्ये सहकारी पाणी पुरवठा संस्थांना वीजदर सवलत दिली जात असणे, सदरची मुदत दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी संपुष्टात येणे, वीजदर सवलत लागू न झाल्याने वीज वितरण कंपनीच्या दराने बिल आकारणी केली जात असणे, सदरचे दर पाणीपुरवठा संस्थेस परवडणारे नसणे, त्यामुळे वीजदर सवलत योजना पुन्हा चालू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (७) | ७६४ | १० | मौजे धामापूर (गावडेवाडी) (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) येथे श्री.विश्वनाथ आंगणे यांचे घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईनसह) उभारण्यासाठी या भागातील स्थांनीकानी (१) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ, सिंधुदूर्ग विभाग, कणकवली (२) मा.उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण उपविभाग, मालवण (३) मा.उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण उपविभाग, कुडाळ यांचेकडे माहे नोव्हेंबर,२०२४ वा त्यासुमारास विनंती अर्ज सादर करणे. सदरची पायवाट लहान मुले, महिला-पुरुष, वयोवृध्द यांचे दिवसारात्री येण्याजाण्याची पायवाट असल्याने रात्री अंधारातून चाचपडत ये-जा करावी लागणे. याबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही अद्यापपर्यन्त धामापूर (गावडेवाडी) श्रीयुत आंगणे यांच्या घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईन) उभारुन देण्याच्या या कामाकडे मागणी करणे, शासनाच्या निष्क्रीयतेमुळे या भागातील रहिवाश्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, परिणामी, मौजे धामापूर (गावडेवाडी) श्री.आंगणे यांचे घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईनसह) उभारण्याचे काम सत्वर हाती घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (८) | ६९० | १० | यवतमाळ जिल्हयातील शेतक-यांना पारंपारिक कृषी वीज कनेक्शन बंद करुल 'मागेल त्याला वीज सौर कृषीपंप' योजनेतून वीज कनेक्शन देण्यात येत असल्याचीबाब माहे जुन-२०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास येणे, यवतमाळ जिल्हयातील शेतक-यांना 'मागेल त्याला वीज सौर कृषीपंप' योजनेतून त्यांना त्वरीत वीज कनेक्शन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ७३२ | १० | मौजे धामापूर (गावडेवाडी) (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) येथे श्री.विश्वनाथ आंगणे यांचे घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईनसह) उभारण्यासाठी या भागातील स्थांनीकानी (१) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ, सिंधुदूर्ग विभाग, कणकवली (२) मा.उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण उपविभाग, मालवण (३) मा.उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण उपविभाग, कुडाळ यांचेकडे माहे नोव्हेंबर,२०२४ वा त्यासुमारास विनंती अर्ज सादर करणे. सदरची पायवाट लहान मुले, महिला-पुरुष, वयोवृध्द यांचे दिवसारात्री येण्याजाण्याची पायवाट असल्याने रात्री अंधारातून चाचपडत ये-जा करावी लागणे. याबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही अद्यापपर्यन्त धामापूर (गावडेवाडी) श्रीयुत आंगणे यांच्या घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईन) उभारुन देण्याच्या या कामाकडे मागणी करणे, शासनाच्या निष्क्रीयतेमुळे या भागातील रहिवाश्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, परिणामी, मौजे धामापूर (गावडेवाडी) श्री.आंगणे यांचे घरासमोर स्ट्रीट लाईट पोल (थ्री फेज लाईनसह) उभारण्याचे काम सत्वर हाती घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई